संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.
23 JUL 2026
प्राप्त झाले सही

**महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, सहायक संचालक संवर्गातील अधिकाऱ्यांची महसूल संवर्ग बदलीबाबत.**

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग

शासन आदेश : संलेको-२०२६/प्र.क्र.८९ (E-१७३६५६९)/कोषा प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २३.०७.२०२६.

### शासन आदेश

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४(४) व ४(५) मधील तरतूदीनुसार, सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील, सहायक संचालक संवर्गातील खालील विवरणपत्रात नमुद अधिकाऱ्यांची त्यांच्या विनंतीनुसार महसूल संवर्ग बदलीने स्तंभ क्र.५ येथील पदावर पदस्थापना देण्यात येत आहे.

238

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव | कार्यरत महसूल विभाग | बदलून दिलेला महसूल विभाग | पदस्थापना |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ |
| १ | श्रीमती मनिषा मनोहर पाटील, सहायक संचालक (प्रशासन), सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर विभाग, नागपूर | नागपूर | पुणे | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, पुणे महानगर परिवहन महामंडळ, पुणे |
| २ | श्रीमती संचयिका भानुदास सरोदे, लेखापरीक्षक वर्ग-१, नगर परिषद, वर्धा | नागपूर | अमरावती | सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, वाशिम |
| ३ | श्रीमती कुमुदिनी नेमिदास भंगाळे, सहायक आयुक्त (लेखा), नगरपरिषद प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर | नागपूर | पुणे | सहायक संचालक, विकास शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे |

२. बदली झालेल्या अधिकाऱ्यांच्या सध्याच्या नियंत्रक अधिकाऱ्यांनी स्थानिक व्यवस्था करुन कार्यमुक्त करावे. उपरोक्त बदली झालेल्या अधिकाऱ्यांनी बदली झालेल्या पदावर तात्काळ रुजू व्हावे. पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतूदींनुसार कारवाई करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

0|502|2026|1992
23.7.2026

३. बदलीच्या ठिकाणी हजर होताच शासनास तसेच संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांना अवगत करावे.

४. वरील अधिकाऱ्यांनी त्यांच्या नवीन पदाचा कार्यभार स्विकारताच त्यांच्या वैयक्तिक माहितीचा तपशिल HRMS मधील नमुन्यात भरुन नवीन कार्यालय प्रमुखांमार्फत वित्त विभाग तसेच संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई या कार्यालयास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(ता. र. पवार)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. सह सचिव, मा. मुख्यमंत्री तथा मा. मंत्री (वित्त) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
२. महालेखापाल - १/२(लेखा व अनुज्ञयेता /लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर *
३. संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
४. संचालक, संचालनालय, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई.*
५. संबंधित अधिकाऱ्याचे सध्याचे कार्यालय प्रमुख.*
६. संबंधित अधिकाऱ्याचे बदली झालेल्या कार्यालयाचे प्रमुख.*
७. प्रधान सचिव (ले.व को .), यांचे स्वीय सहाय्यक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर,
८. संबंधित अधिकारी *,
९. निवड नस्ती, कोषा प्रशा-२.

(* संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांचेमार्फत)